**तातडीचे / ई-मेलद्वारा**

# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.1,2,5 व 6,
हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई-400 001
दूरध्वनी क्र.022-22057409 E-mail : mah-sforum@nic.in

**वाचा** :: 1) मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र यांचे अ.शा.प.क्र.राआ/आस्था/अहवाल/08/19, दि.11.02.2008

2) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राआ/आस्था/कामकाज/परिपत्रक/2009/1194, दि.17.06.2009

3) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राआ/आस्था/दिशानिर्देश/2010/733, दि.23.10.2010

जा.क्र.राआ/आस्था/कामकाज/परिपत्रक/2013/2437 दिनांक-17 जुलै, 2013

## -:: परिपत्रक ::-

यासोबत जोडलेल्या वरील परिपत्रक व पत्रानुसार राज्यातील राज्य आयोगाची परिक्रमा खंडपीठे व सर्व जिल्हा मंचातील अधिकारी (प्रबंधक) व कर्मचा-यांना स्वयंस्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत. विशेषतः गोपनीय वगळता सर्व कार्यालयीन पत्रव्यवहार ई-मेलद्वारे करण्याबाबत तसेच कन्फोनेट प्रणालीतील कामकाज नियमितपणे करण्याबाबत स्वयंस्पष्ट सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

असे असतांनाही या कार्यालयाचे निदर्शनास आले की, बहुतांश कार्यालय ई-मेल सेवेचा वापर करीत नाही. तसेच ई-मेलद्वारा पत्रव्यवहार केल्यानंतरही पुनश्च पोस्ट, फॅक्स, इ.द्वारा सदरचा पत्रव्यवहार करण्यात येतो. सबब त्यामुळे संबंधित कार्यालयाचा व या कार्यालयाचा वेळ तसेच शासकीय स्टेशनरी अनावश्यक खर्ची पडत आहे. तसेच राज्य आयोग, मुंबई कार्यालयात अत्यल्प कर्मचारी वर्ग उपलब्ध असल्याने वरील दुबार कामकाजामुळे सदरील कर्मचा-यांवर अतिरीक्त कामकाजाचा बोजा पडत आहे. तसेच त्यामुळे इतर आवश्यक कामकाजासाठी कर्मचारी उपलब्ध होऊ शकत नाही व कार्यालयीन कामकाजात विलंब होत आहे.